# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १८ जुलै, २०१८ / आषाढ २७, १९४० ( शके )**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी आणि फलोत्पादन मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६३**

---

### पुणे जिल्हयात राबविण्यात येत असलेल्या कामधेनू दत्तक योजनेबाबत

**(१) * ११९८४७ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेने सन २००२ मध्ये दुध उत्पादकता वाढविण्यासाठी आणलेली योजना राज्य शासनाने स्वीकारली असुन ती राज्यात 'कामधेनू दत्तक योजना' नावाने राबवली जात असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयात सन २०१६-१७ या वर्षात १८४ गावांत, तर सन २०१७-१८ मध्ये ७० ते ८० गावांत सदरहू योजना राबवली जात असताना संबंधित अधिकारी ही योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात अपयशी ठरले असल्याचे व योजनेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना नसुन शिबिरेही होत नाहीत तसेच, सामान्यांना माहितीही उपलब्ध करुन दिली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी प्रत्येक गावाला १ लाख ५८ हजार रुपये एवढा खर्च दर्शविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत व संबधित दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.
(२) हे अंशतः खरे आहे.

पुणे जिल्ह्यात सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये अनुक्रमे १८४ व ६६ गावांमध्ये ही योजना राबविण्यात आली. ग्रामसभेच्या मान्यतेने या योजनेंतर्गत पशुपालक मंडळ स्थापन करून, या मंडळाच्या सल्ल्याने योजना राबविली जाते. आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्या कार्यालयाच्या स्तरावरुन सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून, त्यानुसार सदरहू योजना राबविली जात असल्याने, अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना कुठलीही सूचना अथवा माहिती दिली जात नाही, हे खरे नाही. तथापि, काही ठिकाणी रितसर पशुपालक मंडळाची नोंदणी झालेली नसल्याचे आढळून आलेले आहे.
(३) नाही.

निवडलेल्या प्रत्येक कामधेनू दत्तक गावासाठी विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी एकूण रु.१,५२,५००/- एवढा निधी मंजूर असून, त्यापैकी प्रसिध्दी व प्रचार या बाबीवर केवळ रू. २१,०००/- एवढा निधी मंजूर आहे.
(४) होय.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या प्राथमिक चौकशी अंती सदर कार्यक्रम योग्य प्रकारे राबविला गेला नसल्याचे दिसून आलेले आहे.

सदर प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेमार्फत चौकशी सुरू असून, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, पुणे यांना देखील सदर प्रकरणी चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिव पार्वती कन्स्ट्रक्शन, सांगली यांनी रस्त्याच्या कामामध्ये निकृष्ट दर्जाचे साहीत्य वापरल्याबाबत

**(२) * १२३३२९ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिव पार्वती कन्स्ट्रक्शन, सांगली या कंत्राटदारानी दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ मार्च, २०१८ या कालावधीत रस्त्यांची कामे केली असुन अनेक कंत्राटदारांची जिल्हा दरसूचीतील वस्तूंच्या दराबाबत तक्रार असताना सदर कंत्राटदाराने सर्व निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी दराने सादर करून कार्यादेश मिळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराने केलेल्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे निदर्शनास आले असुन कंत्राटदाराने अंदाजपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे डांबर तसेच इतर साहित्य कामामध्ये वापरले किवा नाही याबाबत चौकशी संबधित विभागाने केली आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयानुसार डांबर शासकीय रिफायनरीतून खरेदी करणे अनिवार्य असताना व उक्त कंत्राटदाराने डांबर खरेदीची शासनाकडे जमा केलेली चलने संशयास्पद असताना याबाबत पडताळणी न करता संगनमत करुन संबंधीत अधिकाऱ्यांनी कंत्राटदारास देयके अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन उक्त कंत्राटदार व संबधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

७ पैकी २ कामांच्या निविदा अंदाजपत्रकीय किमंतीपेक्षा कमी दराच्या असून ५ कामांच्या निविदा जवळ जवळ अंदाजपत्रकीय दराच्या आहेत.

(२) संबंधीत विभागाने डांबराचे प्रमाण योग्य आहे कि नाही याची खातरजमा केली आहे.

(३) नाही. हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंगळवेढ़ा (जि.सोलापूर) तालुक्यातील माण व भीमा नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(३) * १२०९५८ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढ़ा (जि.सोलापूर) तालुक्यातील माण व भीमा नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा केला जात असून याकडे महसूल आणि पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक १८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध तातडीने कारवाई करावी अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मंगळवेढ़ा तालुक्यातील माण व भीमा नदीपात्रातुन अवैधरीत्या होणारा वाळू उपसा रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत तसेच येथील वाळू माफियांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील गौण खनिजाच्या अनधिकृत उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी मंडळ अधिकारी व तलाठी यांची पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकांनी माहे मे, २०१८ मध्ये भिमा नदीपात्रातून मंजूर परिमाणापेक्षा अधिक वाळू वाहतूक करणाऱ्या १२ वाहनांवर व गौण खनिजाचे अवैध वाहतूक करणाऱ्या २ वाहनांवर असे एकूण १४ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु.४,१४,३४०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुध्द तातडीने कारवाई करावी अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेहकर-मोळा (ता.मेहकर, जि.बुलढाणा) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) * ११९४८८ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर-मोळा (ता.मेहकर, जि.बुलढाणा) या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) सदर रस्ता दिनांक २३.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रजिमा क्र.८५ म्हणून दर्जोन्नत झाला असून अद्‌याप हा रस्ता जिल्हापरिषद (बांधकाम) विभाग, बुलढाणा यांच्याकडून सा.बां.

विभागाकडे देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत झालेला नाही. हस्तांतरण झाल्यानंतर या रस्त्याची पाहणी करून निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार रस्त्याची दुरूस्ती करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गतच्या कामांबाबत

**(५) * १२२१५७ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत ज्ञानेश्वर मंदिरासाठी सुमारे तीन कोटी रुपयांचा निधी रस्ता, फुटपाथ व गटार बांधण्यासाठी देण्यात आला असताना रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत असल्याचे व फुटपाथ आणि गटारांची कामे अद्याप सुरुच झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत ठेऊन फुटपाथ आणि गटारांची कामे अद्याप सुरु न करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

रस्त्याचे काम पुर्ण करण्यात आले असून फुटपाथ व गटारे बांधण्याचे काम बाकी आहे.

(२) नाही.

(३) कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही झाली असून त्यांचेकडून काम काढुन घेण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी नोटीस दिली आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर-धुळे (जि.उस्मानाबाद) महामार्गासाठी वापरलेल्या गौण खनिजांच्या स्वामित्वधनाची रक्कम न भरल्याबाबत

**(६) * १२२२६० श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या चौपरदीकरणाचे काम आयआरबी कंपनीमार्फत सुरु असुन सदर कामासाठी वापरण्यात येणाऱ्या मुरुम आणि दगडांच्या स्वामित्वधनाची रक्कम उक्त कंपनीने शासनाकडे भरली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकारी व कंपनी यांचे संगनमत असल्यामुळे कंपनीने स्वामित्वधनाची रक्कम भरली नसून त्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार उक्त कंपनीकडून स्वामित्वधनाची रक्कम वसूल करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत सोलापूर-धुळे रा.म.क्र.२११ चौपदरीकरणाचे काम प्रगतीत असून ९१ कि.मी. रस्त्याचे काम पूर्ण झाले असून त्यासाठी वापरलेल्या मुरुम व दगडांची स्वामित्वधनाची रु.४४.२१ कोटी एवढी रक्कम संबंधित कंत्राटदारानी जमा केले असून संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून नियोजित ठिकाणाकडून खाण कामासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आल्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील ग्रामीण प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे बांधकाम अर्धवट स्थितीत असल्याबाबत

**(७) * १२४४७९ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील ग्रामीण प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या बांधकामाकरीता ४ वर्षात १४ कोटी रुपयांचा निधी खर्च करुनही कार्यालयाचे बांधकाम अर्धवट स्थितीत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयाचे बांधकाम अर्धवट स्थितीत असल्यामुळे कार्यालयात विधी कामाकरीता येणाऱ्या वाहनधारकांना ऐन उन्हाळयात धान्याच्या गोदामाच्या टिनच्या शेडखाली बसुन काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव मंजुरीकरीता शासनाने सन २०१० मध्ये पाठविला असुन त्याला सन २०१४ मध्ये मान्यता मिळाली असतानाही अद्यापर्यंत बांधकाम पुर्ण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर इमारतीचे बांधकाम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामीण) कार्यालयाच्या नविन इमारत बांधकामासाठी रु.१३.२० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि. ०१.०२.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर इमारतीचे ९५% बांधकाम (civil work) पुर्ण झाले असून विद्युत विषयक काम बाकी आहे. या इमारतीसाठी माहे मार्च २०१८ पर्यंत रु. १२.५१ कोटी एवढा निधी खर्च झालेला आहे.

(४) सदर बांधकाम पूर्ण करुन इमारतीचा त्वरीत ताबा देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परिवहन उपायुक्त, ठाणे यांनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने केलेला गैरव्यवहार

**(८) * ११७४८८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन उपायुक्त, ठाणे श्री.अरुण भालचंद्र व परिवहन विभागातील इतर १५ अधिकाऱ्यांनी शासनाचा २ कोटी रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत विभागीय चौकशी करण्याचे आदेश परिवहन विभागाला देऊनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष यांनी पंतप्रधान कार्यालयाकडे तक्रार केली असुन त्या अनुषंगाने चौकशी करण्याचे आदेश पंतप्रधान कार्यालयाने राज्याचे मुख्य सचिव यांना दिल्याचे दिनांक १३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अधिकाऱ्यांची चौकशी न करता त्यांना पाठबळ देण्याचे काम तत्कालीन परिवहन आयुक्त, परिवहन विभागाचे उपसचिव, अप्पर परिवहन आयुक्त व सह परिवहन आयुक्त करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, श्री भालचंद्र यांनी राज्य शासनाच्या महसूलाचा हानी करूनही त्यांची प्रादेशिक परिवहन अधिकारी पदावरून परिवहन उपायुक्त पदावर नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्याचे मुख्य सचिव यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) श्री.शरद धुमाळ यांची तक्रार प्रधानमंत्री कार्यालयाने राज्य शासनास योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) श्री. भालचंद्र यांची नियमित पदोन्नती परिवहन उपायुक्त या पदावर झालेली आहे.
(४) संबंधित जबाबदार अधिका-यांची विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोप पत्रे बजावण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कुरुंद व तळवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(९) * १२११६६ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कुरुंद व तळवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे मे.प्रख्यात इंफ्रोप्रोजेक्ट प्रा.लि. कंपनीने अनधिकृत बांधकाम केल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (भिवंडी) यांनी मा.महसूल मंत्री व प्रधान सचिव, महसूल विभाग यांना दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार व सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदरच्या अनधिकृत बांधकामावर तसेच सदर कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२), (३) व (४) मौजे कुरुंद व मौजे तळवली, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील एकूण २,९९,७८३.५३ चौ.मी. क्षेत्रास शितगृह या कृषिपूरक बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यास मे.प्रख्यात इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. कंपनीस जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १४/०८/२०१२ च्या आदेशान्वये परवानगी दिली आहे. सदर ठिकाणी उक्त कंपनीने वाणिज्य प्रयोजनासाठी वापर सुरु केल्याचे आढळून आल्याने उक्त कंपनीच्या संचालकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतूदीन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर ठिकाणी उक्त कंपनीने वाढीव बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने उक्त कंपनीकडून सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता रक्कम रुपये २०,२६,५३९/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

-----------------

## वाशीम जिल्हयात बेकायदेशीरपणे भूखंडाचे हस्तांतरण केल्याबाबत

**(१०) * १२२१७७ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्हयात उपविभागीय अधिकारी, महसूल, तहसिलदार तसेच दुय्यम निबंधक यांनी संगनमत करून नियोजन प्राधिकरणाची परवानगी न घेता बेकायदेशीरपणे भूखंडाचे हस्तांतरण केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधात जिल्हाधिकारी, वाशीम यांनी दिनांक ३० मे, २०१८ रोजी पर्यंत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश संबंधीतांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषी अधिकारी व इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) शासन अधिसुचना, महसूल व वन विभाग, दि. ०५/०१/२०१७ अन्वये अंतिम विकास योजना क्षेत्रात समाविष्ठ केलेल्या जमिनीसाठी जमीन वापरातील रुपांतरणाविषयी तरतूद महाराष्ट्र जमिन महसूल सहिता १९६६ मध्ये कलम ४२ ब च्या स्वरुपात करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सबंधित तहसिलदार यांनी विकास योजनेत दर्शवलेल्या वापराच्या आधारे अशा जमिनींची अकृषक आकारणी निर्धारीत करून संबंधित भोगवटदाराला नोटीस दिली होती. विकासकांनी अकृषक आकारणीचा भरणा केल्यानंतर अशा जमिनीवरील अभिन्यासाला नियोजन प्राधिकरणाची विकास परवानगी घेवून अभिन्यासातील भूखडांचे हस्तांतरण करणे आवश्यक होते. तथापि, अभिन्यासाला नियोजन प्राधिकरणाची विकास परवानगी न घेता वाशिम जिल्हयामध्ये एकूण ३२८ भूखंडांचे हस्तांतरण झाल्याचे व अशा व्यवहाराची नोंद अधिकार अभिलेखात झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, वाशिम यांनी दि. ०५/०५/२०१८ च्या पत्रान्वये सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व उप अधिक्षक, भूमि अभिलेख, वाशिम यांना विषयांकित प्रकरणी चौकशी करून दि. ३०/०५/२०१८ पर्यंत माहिती सादर करण्याबाबत तसेच दि. २२/०६/२०१८ च्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, वाशिम यांना तलाठी वाशिम भाग-१, २, ३ व गोदेश्वर यांची दप्तर तपासणी करून त्यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत व बेकायदेशीररित्या घेण्यात आलेल्या सर्व नोंदी रद्द करून अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

-----------------

## मुंबईतील मंत्रालयाच्या परिसरातील फाऊन्डेशन आणि बेडिंगच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(११) * ११८१७३ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्रालयाच्या आवारातील फाऊन्डेशन आणि बेडिंगच्या "प्रोव्हायडिंग अॅण्ड लेईंग इन सिटू सिमेंट कॉंक्रीट एम १५ ऑफ ट्रॅप मेटल

फॉर फाऊन्डेशन ॲण्ड बेडिंग इन्क्ल्युडिंग मेलिंग आऊट वॉटर मॅन्युअली फॉर वर्क काम्पॅक्टिंग ॲण्ड क्यूरिंग" या कामासाठी सन २०१५ च्या ऑगस्ट आणि नोव्हेंबर महिन्यात कार्यादेश काढण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या कामाचे कार्यादेश काढण्यात आले परंतु सदर काम करण्यात आले नसून या कामाची सर्व देयके दिनांक २७ मार्च, २०१७ रोजी लेखाशिर्ष २०५९ अंतर्गत अदा करण्यात आली असल्याचे दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदरहू काम न करता देयके अदा करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) शासनाने दिनांक १९.०४.२०१७ च्या पत्रान्वये याबाबत चौकशी करण्याचे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांना निर्देश दिले आहेत.

(३), (४) व (५) चौकशी प्रगतीपथावर आहे.

-----------------

## कोल्हापूर-सांगली महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१२) * १२५६९३ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांना जोडण्यासाठी "बांधा वापरा आणि हस्तांतरित करा" या तत्वावर बांधण्यात येत असलेल्या महामार्गाचे काम प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम करत असलेल्या सुप्रिमो कंपनीने शासनाची कोणतीही परवानगी न घेता हातकणंगले येथे उड्डाणपुलाचे काम सूरू केले असून सदरच्या कामाला कोणत्याही अधिक निधीची तरतूद करण्यात आलेली नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गावर मोठया प्रमाणात रहदारी असून महामार्गाचे काम अपूर्ण असल्यामुळे सामान्य जनतेची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हातकणंगले येथे मंजुर निविदेप्रमाणे २२.२५ मीटर लांबीच्या भराव्यावरच्या उड्डाणपुलाच्या ऐवजी जनतेच्या/ स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार पिअरवरील (Elevated road) उड्डाणपूल हाती घेण्यात आला आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) शासनस्तरावर वेळोवेळी बैठका घेवून उद्योजकास काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे दिनांक ३.०१.२०१५ पासून उद्योजकास रुपये १.५० लक्ष प्रति दिवस Liquidated damage लागू करण्यात आला आहे.

या प्रकल्पाच्या एकूण ५२.६१ किमी लांबीपैकी ३५.४१ किमी लांबी राष्ट्रीय महामार्ग झाला असल्यामुळे हे काम केंद्र सरकारकडे हस्तांतर करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर प्रकल्पाच्या वादासंदर्भात लावादकाचे काम सुरु आहे. तथापि, सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# पैठण (जि.औरंगाबाद) येथे काँक्रीट रस्त्याच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(१३) * १२३४०५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण विकास प्राधिकरणांतर्गत पैठण (जि.औरंगाबाद) येथे १६ कोटी रुपये निधी खर्चून १६०० मी.लांबीच्या चौपदरी काँक्रीटच्या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची जाडी निविदेत नमूद केलेल्या जाडीपेक्षा कमी असून काम पूर्ण झाल्यानंतर केवळ सहा महिन्याच्या कालावधीतच या रस्त्याला भेगा पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) पैठण व आपेगाव विकास प्राधिकरणांतर्गत हाती घेण्यात आलेल्या पाच रस्त्यांची लांबी २३१५.७० मी. इतकी असून रू.१३.१२ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

प्रस्तूत पाच रस्त्यांपैकी चार रस्त्यांची जाडी कमी असल्याचे आढळून आले आहे व काही ठिकाणी भेगा पडल्या आहेत. या संदर्भातील प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने संबंधीत तीन शाखा अभियंता यांना निलंबित करण्यात आले आहे.

याबाबत चौकशी सुरू असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत देखील उघड चौकशी सुरू आहे. याशिवाय संबंधित कंत्राटदारांना कोणतेही काम देण्यात येऊ नये, असा निर्णय पैठण व आपेगाव विकास प्राधिकरणाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# मालवण-देवबाग (जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१४) * ११६६०२ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण - देवबाग (जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी गैरसोयीचा झाला असून त्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या पर्यटक तसेच प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत परिसरातील ग्रामस्थांनी गत ३ वर्षापासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री सिंधुदुर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालवण यांच्याकडे मागणी केलेली असतानाही अद्यापपर्यंत याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण वायरी तारकर्ली देवबाग या रस्त्यावरील सर्व खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्यात आले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्नांकित मालवण वायरी तारकर्ली देवबाग रस्ता कि.मी. ५/०० ते ७/७०० व कि.मी ७/७०० ते १०/७०० मध्ये मजबूतीकरण व डांबरीकरण करणे ही कामे पुर्ण करण्यात आली आहेत. मालवण तालुक्यातील मालवण कसाल रस्ता रा.मा. १८० कि.मी. ०/०० ते ३३/०० व मालवण देवबाग रस्ता प्रजिमा-

२८ कि.मी. ०/०० ते १२/०० मध्ये सुधारणा करणे, हे काम हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत निविदा स्तरावर असून सदर कामाची एकत्रित निविदा प्रक्रिया पूर्ण होताच रुंदीकरणाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी मजूर सहकारी संस्थांना नियमबाहयरित्या कामे दिल्याबाबत

**(१५) * १२४२९५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड येथील तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी बनावट शिफारस पत्राच्या आधारावर मजूर सहकारी संस्थेला नियमबाहयरित्या ३० लाख रुपये किमंतीची ७ कामे देऊन दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजी या कामाचे करारनामे केल्याचे दिनांक ९ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संबधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली असतांनाही कोणतीही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबधित अधिकारी व कंत्रांटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मजूर सहकारी संस्थांना काम वाटप करण्याच्या प्रक्रियेसंदर्भात प्राप्त तक्रारींची चौकशी करण्यात आली.

सदर चौकशीत महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील नियमांचे उल्लंघन झालेले नाही, असे आढळले आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मजले (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे अवैधरित्या गौण खनिजांचे उत्खनन सुरु असल्याबाबत

**(१६) * १२१२२९ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मजले (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे अवैधरित्या स्वामित्वधनाची रक्कम न भरता लाखो रुपयांच्या गौण खनिजांचे उत्खनन सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध उत्खननामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असून पर्यावरणाचाही ऱ्हास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मजले येथे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गारगोटी-पाटगाव (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) या रस्त्यावरील पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) * १२३४७४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगोटी-पाटगाव (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) या ३५ कि.मी. लांबीच्या रस्त्यावरील सर्वच जुन्या पुलांचे कठडे, संरक्षक दगड (गार्डस्टोन), सरंक्षक लोखंडी पाईप्स नादुरूस्त झाल्याने दिवसेंदिवस अपघातामध्ये वाढ होत असून गेल्या ५ वर्षाच्या कालावधीमध्ये २० हून अधिक नागरीकांना आपला जीव गमवावा लागल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, या रस्त्यावरील सर्व पुलांचे सर्वेक्षण करून त्यांची दुरूस्ती करण्याबाबत तसेच नवीन संरक्षण कठडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: हे खरे आहे.
प्रश्नांकीत मठकुडाळ शिवडाव कडगाव पाटगाव गारगोटी हा राज्यमार्ग क्र.१७९ असा असून डोंगराळ व अतिपर्जन्यवृष्टीचा प्रदेश आहे.

गारगोटी ते पाटगाव या रस्त्याच्या लांबीत असलेले पुल हे अरूंद व जुन्या दगडी बांधकामातील आहेत. सदर लांबीत व्यवसायीक, शैक्षणिक तसेच पर्यटन स्थळ असल्याने वाहनांच्या रहदारीत वाढ झाली आहे. सदर रस्त्यावर भुदरगड पोलीस ठाणे यांच्या दप्तर नोंदीनुसार सन २०१३ ते २०१८ या कालावधीत २९ अपघाताची नोंद असून त्यात जीव गमावलेल्या नागरिकांची संख्या नमुद नाही. तसेच अपघातांचे कारण नमूद नसल्यामुळे रस्ता वा पुलाच्या दुरावस्थेमुळे किती अपघात झाले हे समजून येत नाही.
(२) सदर गारगोटी ते पाटगाव या लांबीतील पुलांचे सर्वेक्षण झाले असून हा रस्ता सुधारणेसाठी हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रमांतर्गत मंजुरी प्राप्त असून लवकरच रस्ता व पुलांचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीस रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मेहुणाराजा (ता.देऊळगाव राजा, जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१८) * १२०६३८ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मेहुणाराजा (ता.देऊळगाव राजा, जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा प्रकल्पामध्ये जमिनी गेलेल्या शेतक-यांचे पुनर्वसन करण्याबाबत तेथील नागरिकांनी वारंवार संबधित अधिका-यांकडे निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार मेहुणाराजा येथील खडकपुर्णा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर गावातील केवळ ३० टक्के शेतजमिनी बाधित असून सदर गावाचे पुनर्वसन अनुज्ञेय नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यात जिओ, रिलायन्स व इतर कंपन्यांनी शेतक-यांचे केलेले आर्थिक नुकसान

**(१९) * १२४३३७ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यात जिओ, रिलायन्स व इतर कंपन्यांनी केबल टाकण्यासाठी शेतकऱ्यांची व शासनाची कोणतीही परवानगी न घेता शेतीचे खोदकाम केल्याने पाईप लाईन फुटून शेतीचे नुकसान झाले असून या कंपन्यांनी शेतकऱ्यांना नुकसानाची भरपाई न दिल्याने शेतकऱ्यांनी पोलीस स्टेशन व लोकप्रतिनिधीकडे तक्रारी केल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शेतकऱ्यांना नुकसानीचा मोबदला देण्यासह विनापरवाना शेतीचे खोदकाम करुन केबल टाकणाऱ्या उक्त कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील आनंद कन्स्ट्रवेल या एजन्सीवर कारवाई करण्याबाबत

**(२०) * १२३४००  श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील प्रजिमा ६१ वरील किमी ०/००० ते ४/५२५ या टप्प्यातील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने मंजुरी दिली असून या रस्त्याचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु असल्याचे तसेच निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याने रस्त्याच्या कामाची गुणवत्ता व दर्जा तपासणीनंतर देयक अदा करण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर अडथळा ठरत असलेले पिंपळाचे झाड तोडण्यासाठी आनंद कन्स्ट्रवेल या एजन्सीने संबंधित मजुराला कोणतीही साधने व साहित्य न दिल्याने झाडावरुन पडून मजूर श्री.कान्हू गिरा यांचा दिनांक १८ मे, २०१८ रोजी मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना मयत मजुराच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासून देयके अदा करण्याबाबत तसेच मयत मजुराच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देऊन आनंद कन्स्ट्रवेल या एजन्सीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

सदरील रस्त्याच्या बांधकामास अडथळा निर्माण होणारी २ झाडे तोडण्यासाठी शहापूर नगरपंचायतीकडे शहापूर उपविभागाने दि.३०.१.२०१८ व दि.२२.२.२०१८ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. परवानगी अप्राप्त असल्याने कंत्राटदारास झाड तोडण्याच्या सूचना सा.बां. विभागाकडून देण्यात आलेल्या नव्हत्या. झाड तोडण्याची परवानगी दि. २१.५.२०१८ रोजी प्राप्त झाली.

(३) प्रश्न क्र.१ मध्ये नमुद पत्र संबंधित सा.बां. विभागास प्राप्त झाल्यानंतर या कामाचे कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

आर्थिक मदतीबाबतचे कोणतेही पत्र विभागाकडे प्राप्त नाही.

(४) कामाच्या गुणवत्तेच्या अनुषंगाने दक्षता व गुणनियंत्रण मंडळाला तपासणी करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. अपघाताच्या अनुषंगाने शहापूर पोलिस स्टेशनमध्ये दि.२६.५.२०१८ रोजी एफ. आय.आर.क्र. ०२४१ नोंदविण्यात आला आहे. याबाबत चौकशी करण्याची कार्यवाही पोलिस विभागामार्फत प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक विभागातील नंदूरबार, जळगाव व अमळनेर या भागातून वाळूची वाहतूक होत असल्याबाबत

**(२१) * ११९०३९ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र वाळू उपशावर बंदी असताना नाशिक विभागातील नंदूरबार, जळगाव जिल्ह्यातील जळगाव व अमळनेर भागातून बेकायदेशीर वाळूची वाहतूक केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान होत असून नागरीकांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे याबाबत वारंवार तक्रारी केल्या असतानाही या वाळू तस्करांवर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नाशिक विभागात वाळू तस्करी करणाऱ्या वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात सरसकट वाळू उपशावर बंदी नाही. तथापि, नाशिक जिल्ह्यामध्ये जळगांव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातून बेकायदेशीर वाळू वाहतूक होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) नागरिकांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे तक्रार केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) नाशिक जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१८ ते जून, २०१८ या कालावधीत जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातून वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ३८ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु.८९.२९ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

तसेच नाशिक विभागात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याकरीता जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. सदर पथकांमार्फत माहे एप्रिल, २०१८ ते मे, २०१८

या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या २६५ प्रकरणात कारवाई करुन रु.३४६.६९ लक्ष इतकी दंड आकारणी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दासवे ते धामणहोळ (ता.मुळशी, जि.पुणे) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२२) * ११९१९४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दासवे ते धामणहोळ (ता.मुळशी, जि.पुणे) या रस्त्यावर अनेक खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्याच्या बाजूची गटारे वेळीच दुरुस्त न केल्याने तसेच रस्त्यावरील डांबर व खडीही उखडली असल्यामुळे अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिक तसेच प्रवाशांची रस्त्यावरून प्रवास करताना मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित दासवे ते मुगाव प्रजिमा १६४ व मुगाव ते धामणहोळ प्रजिमा ११२ असा आहे. सदर रस्त्याच्या बाजुची गटारे बांधीव पध्दतीची पक्की गटारे आहेत. तसेच रस्त्याचा काही क्षतिग्रस्त लांबी खडी मुरमांने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्नांकित दासवे ते धामणहोळ दरम्यानच्या रस्त्याची लांबी १५ कि.मी. आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. रस्त्याच्या डांबरी नुतनीकरणाचे काम निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांजगाव फाटा ते ताकईगाव (जि.रायगड) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) * १२०८२६ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीतील सांजगाव फाटा ते ताकईगाव या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्यामुळे रस्त्यावरुन प्रवास करणे गैरसोयीचे होऊन वारंवार अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, खोपोली यांच्याकडे वारंवार लेखी निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्याची कि.मी. १४६/३०० ते १४७/३०० ही नगर परिषद हद्दीमधील लांबी खोपोली नगर परिषदेच्या अखत्यारीतील असून अवजड वाहतुकीमुळे रस्त्याची दुरावस्था होत आहे.

(२) हे खरे नाही.

रस्त्याची उर्वरीत लांबी कि.मी. १४३/०० ते १४६/३०० व १४७/३०० ते कि.मी. १५२/८०० ही लांबी सा. बां. विभागाकडे असून सुस्थितीत आहे

(३) नगर परिषदेच्या अखत्यारीतील लांबीसाठी कॉंक्रीट रस्ता करण्याची शिफारस असून याबाबत नगर परिषदेकडून कार्यवाही अपेक्षीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील रिक्षा चालक-मालक संघटनांनी विविध मागण्यांसाठी काढलेला मोर्चा

**(२४) * ११७४९२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील रिक्षा चालक-मालक संघटनांनी त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी माहे एप्रिल, २०१८ च्या तिसऱ्या सप्ताहात दापोली ते रत्नागिरी अशी पदयात्रा काढली असुन दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन सादर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्षा चालकांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने रिक्षा चालक-मालक संघटनेच्या प्रलंबित मागण्या मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) व (३) रिक्षा चालक-मालक संघटना दापोली यांनी दि. २६.०३.२०१८ च्या निवेदनाद्वारे तसेच रिक्षा चालक-मालक व मालवाहू संघर्ष समिती, रत्नागिरी यांनी दि. १६.०४.२०१८ च्या निवेदनान्वये दापोली शहरातील व रत्नागिरी जिल्ह्यातील अवैध प्रवासी वाहतूक बंद करण्याची प्रामुख्याने मागणी केलेली आहे.

अवैध वाहतूकीसंदर्भात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, रत्नागिरी यांच्या अधिपत्याखाली वायुवेग पथकांकडून सातत्याने कार्यवाही करण्यात येत आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, रत्नागिरी यांच्याद्वारा दि.०१.०४.२०१८ ते दि.२४.०४.२०१८ या कालावधीत एकूण ४१० वाहने तपासण्यात आली असता त्यापैकी ७७ वाहने दोषी आढळली असून ३५ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. सदर प्रकरणी वाहनधारकांकडून रु.१,७२,०२२ इतका दंड व कर वसुल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देऊळवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथे मुरुमाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(२५) * १२१३४६ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळवाडी (ता.कर्जत,जि.अहमदनगर) येथे गट क्रमांक ३१मधील “नो मायनिंग झोन” असणाऱ्या गायरान जमिनीवर माहे एप्रिल-मे, २०१८ पासून मुरुमाचे अवैध उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक जनतेनी तहसिलदार कर्जत, ग्रामसेवक, तलाठी देऊळवाडी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार देऊळवाडी येथे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मंडळ अधिकारी, भांबोरा व तलाठी, देऊळवाडी, ता.कर्जत यांनी दि.१४ जून,२०१८ रोजी केलेल्या स्थळपाहणीत देऊळवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील गट क्र.३१ या

जमिनीवरुन अंदाजे ३२ ब्रास मुरुम या गौणखनिजाचे उत्खनन झाल्याचे दिसून आले. मात्र सदर उत्खनन कोणत्या कालावधीत झाले व कोणी केले याबाबत माहिती प्राप्त न झाल्याने संबंधिताविरुध्द कारवाई करता आली नाही.

मात्र या उत्खननाबाबत स्थानिकांकडून लेखी तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी तालुका स्तरावर पथके स्थापन करण्यात आली आहेत. माहे एप्रिल, २०१८ ते मे,२०१८ या कालावधीत कर्जत तालुक्यात सदर पथकांमार्फत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ६ प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रु.७,१६,५२५/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ६ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकास कामात झालेला गैरव्यवहार

**(२६) * ११७१७६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकास कामासाठी माहे फेब्रुवारी-मार्च, २०१६ मध्ये तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्यासह २२ अभियंता यांनी बनावट निविदा व करारनामे करुन वर्क ऑर्डर काढली असून प्रत्यक्षात कामे न करता २२ कोटी रुपयांच्या देयकांचे धनादेश वटवून गैरव्यवहार केल्याचे उपलब्ध मोजमाप पुस्तिका आणि देयकाच्या सत्य प्रतीवरुन माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दक्षता अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्यामार्फत सुरु असलेल्या चौकशीस प्रदिर्घ विलंब झाल्यामुळे अवर

सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांनी विनाविलंब चौकशी करुन दोषी विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार तत्कालीन दोषी कार्यकारी अभियंता व अन्य संबंधीत अभियंत्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) वरळी, मुंबई येथील बीडीडी चाळीच्या कामात गैरव्यवहार प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीची शासनाने गंभीर दखल घेतली. या सर्व तक्रारीची अधिक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले. अधिक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार बीडीडी चाळीच्या पुनर्विकास कामात मुदत उलटून देखील काम अपूर्ण असणे, कामाची विभागणी करणे, विभागणीस सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी न घेणे, करारनाम्यातील तरतूदीनुसार कंत्राटदारास बांधकाम साहित्याच्या चाचणीपोटी रक्कम अदा केली असणे, तथापि, दक्षता पथकास चाचणी अहवाल उपलब्ध करून न देणे अशा प्रकारच्या प्रशासकीय अनियमितता झाल्या आहेत. सदर अनियमिततेस तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व शाखा अभियंता हे संयुक्तरित्या जबाबदार असल्याने त्यांच्या विरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

-----------------

## पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील फर्निचरच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२७) * ११६६१७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील फर्निचरच्या कामासाठी शासनाकडून निधी उपलब्ध नसताना व कामासाठी प्रशासकीय पातळीवर कोणत्याही प्रकारचे प्रयोजन नसताना फर्निचरच्या कामाची निविदा काढून काम सुरु केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नियमानुसार निधीची उपलब्धतता असल्याशिवाय निविदा काढता येत नसताना व किमान दहा टक्के निधी असल्याशिवाय काम सुरू करता येत नसतांना ठेकेदाराच्या फायदयासाठी विधानभवन, पुणे येथे वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत फर्निचर घेऊन काम सुरू केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त प्रकरणातील दोषी अधिकारी व संबंधीत ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील रु.१०१०.८६ लक्ष अंदाजित किंमतीच्या फर्नीचरच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतरच करण्यात आली आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) शहरातील सिमेंट रस्ता बांधकामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

**(२८) * ११९७४३ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) शहरात केलेली सिमेंट रस्ता बांधकामे कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी निकृष्ट दर्जाची केल्याने या कामांची चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकारी यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) होय, सदर कामाचा दर्जा विनिर्देशा प्रमाणे आहे.

(३) कंत्राटदार तसेच अधिकारी यांनी कोणतीही अनियमितता केलेली नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजीवडा (जि.रत्नागिरी) येथील मत्स्योद्योग शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२९) * १२३९५० श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीवडा (जि.रत्नागिरी) येथील मत्स्योद्योग शाळेच्या इमारतीचे छप्पर नादुरुस्त झाले असून शाळेच्या भिंतीलाही तडे गेल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या दुरुस्तीबाबत जिल्हा परिषद व मत्स्त्योद्योग विभागाला वारंवार निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मत्स्योद्योग शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) दुरुस्ती योग्य खोल्यांचे सर्वेक्षण माहे जून, २०१८ मध्ये पंचायत समितीचे शाखा अभियंता व शिक्षण विभाग यांचेमार्फत करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षणामध्ये या शाळेच्या १३ वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी अंदाजे २५ लक्ष इतक्या रकमेची आवश्यकता आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत शाळा दुरुस्तीसाठी सदर शाळेची दुरुस्ती प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) सदरची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये निदर्शनास आली असून त्यादृष्टीने जिल्हा वार्षिक योजनेच्या चालु वर्षी २०१८-१९ च्या आराखड्यामध्ये दुरुस्ती प्रस्तावित करण्यात येत आहे.

-----------------

## वांद्रे-पूर्व (मुंबई) येथील शासकीय वसाहतीमधील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(३०) * १२४४२८ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे-पूर्व (मुंबई) येथील शासकीय वसाहतीमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमणे करण्यात आली असून सदर अतिक्रमणे पाडण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसाहतीमधील फुटपाथही लोकांना चालण्यासाठी उपलब्ध नसून अतिक्रमणे काढल्यानंतर काही कालावधीत पुन्हा अतिक्रमण होत असल्याने यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार वांद्रे-पूर्व येथील शासकीय वसाहतीमधील अतिक्रमणे निष्कासित करुन पुन्हा अतिक्रमणे होऊ नये म्हणून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

शासकीय वसाहत वांद्रे (पूर्व) येथील सावर्जनिक बांधकाम विभागाच्या जागेवर वेळोवेळी होणारी अतिक्रमणे सावर्जनिक बांधकाम विभागामार्फत निष्कासित केली जातात.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) शासकीय वसाहत वांद्रे (पूर्व) येथील सावर्जनिक बांधकाम विभागाच्या जागेवर वेळोवेळी होणारी अतिक्रमणे सावर्जनिक बांधकाम विभागामार्फत निष्कासित केली जातात. अतिक्रमणे निष्कासित करणेकामी सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, एच् पूर्व विभाग, मा.उपजिल्हाधिकारी (अति/निष्कासन) बांद्रा-१ व कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी, मुंबई या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने संयुक्तरित्या ८० अनधिकृत शेड/गाळे निष्कासित करून पंचनामा करण्यात आला आहे.

सदरील अतिक्रमण होऊ नये व नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने उपजिल्हाधिकारी/मालमत्ता अधिकारी हे पद पुनर्जिवित करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## चिखलहोळ (ता.खानापूर, जि.सांगली) परिसरातील येरळा नदीपात्रातील अवैध उत्खननाबाबत

**(३१) * १२५२४६ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलहोळ (ता.खानापूर, जि.सांगली) परिसरातील येरळा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या वाळूचा उपसा करून तस्करी करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार नदीपात्रातून अवैधरीत्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी तालुकास्तरावर पथके कार्यान्वीत करण्यात आली आहे. सदर पथकाद्वारे खानापूर तालुक्यामध्ये माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ५९ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.२७,५८,७८०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबेगाव व जुन्नर (जि.पुणे) या तालुक्यातील शेतकऱ्यांची झुआरी कंपनीकडून झालेली फसवणूक

**(३२) * १२०३५९ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव व जुन्नर (जि.पुणे) या तालुक्यांतील शेतकऱ्यांनी झुआरी कंपनीकडून ममता फ्लॉवर या जातीच्या फ्लॉवर पिकाचे बियाणे घेऊन लागवड केली असता फ्लॉवर रोपांना हवे तसे पीक आले नसल्याने शेतकऱ्यांनी उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, आंबेगाव व जुन्नर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांची ज्याप्रकारे फसवणूक झाली त्याचप्रमाणे फ्लॉवर उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक होवुन त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या झुआरी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) पुणे जिल्ह्यातील जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील एकूण ६ शेतकऱ्यांनी झुआरी ॲग्रो कंपनीच्या ममता या फ्लॉवर वाणाच्या रोपांची एकूण १.७५ हेक्टर क्षेत्रावर लागवड केलेली होती. या संदर्भात फ्लॉवर रोपास गड्डे लागलेले नसल्याची तक्रार संबंधित शेतकऱ्यांकडून दिनांक १७.४.२०१८ रोजी प्राप्त झालेली आहे.
(२) व (३) तालुका तक्रार निवारण समितीमार्फत नुकसानग्रस्त क्षेत्राची पाहणी करण्यात आलेली आहे. सदोष बियाणांमुळे फ्लॉवर पिकास गड्डे लागलेले नसल्याचा निष्कर्ष समितीने दिलेला होता. त्यानुषंगाने बियाणे उत्पादक कंपनीस व नर्सरीधारकास या संदर्भात कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. तथापि, बियाणे उत्पादक कंपनी / विक्रेता यांनी संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम दिल्याने शेतकऱ्यांनी तक्रार मागे घेतलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील शासकीय कार्यालयात पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असल्याबाबत

**(३३) * ११९२८७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयात लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यातील बहुतांश टाक्या पाण्याअभावी कोरडया पडुन त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील विविध शासकीय कार्यालयात पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नसल्यामुळे कर्मचा-यांसह कार्यालयात येणा-या नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असुन याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन बुलढाणा जिल्हयातील जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयासह विविध शासकीय कार्यालयात पिण्याच्या पाण्याची होणारी गैरसोय दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात तसेच नवीन इमारतीत वॉटर कुलर बसविण्यात आलेले आहेत. शासकीय कर्मचारी व कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे.

बुलढाणा जिल्हयातील एकुण १३ पैकी ३ तहसिल कार्यालय इमारतीतील पाण्याच्या टाक्या नादुरूस्त आहेत. त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. तर ५ तहसिल कार्यालयीन इमारतीत पिण्याच्या पाण्याच्या टाक्या नसल्याने आर.ओ., रांजण, बोअरवेल इत्यादी साधनाव्दारे पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. उर्वरित ५ तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था आहे.

नादुरूस्त असलेल्या टाक्यांची दुरूस्ती करण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविण्यात आलेले आहे.

ह्या व्यतिरिक्त बुलढाणा जिल्ह्यातील विविध शासकी कार्यालयामध्ये पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था नळ, बोअरवेल, वॉटर कुलर इ. साधनांद्वारे करण्यात आलेली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पायुबंदर व नागलाबंदर (जि.पालघर) खाडीमधून अवैधरित्या रेतीचा उपसा करण्यात येत असल्याबाबत

**(३४) * १२१५५३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पायुबंदर व नागलाबंदर (जि.पालघर) खाडीमधून अहोरात्र अवैधरित्या रेतीचा उपसा करण्यात येत असल्याचे व या अवैध रेती उपशामुळे या बंदरांच्या किनारपट्टीस तसेच घोडबंदर रोडवरील पुलास धोका निर्माण झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध रेती उपशाबाबत नागरिकांनी जिल्हाधिकारी, पालघर, प्रांत अधिकारी व प्रधान सचिव, महसूल विभाग यांचेकडे वारंवार तक्रारी केल्या असतानाही या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पायुबंदर व नागलाबंदर या खाडीमधून अवैधरित्या रेतीचा उपसा करणाऱ्या रेती माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि, उक्त आशयाचे मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे मा.मंत्री

(महसूल) यांना उद्देशून लिहिलेल्या दि.१६/५/२०१८ रोजीच्या पत्राची प्रत प्रधान सचिव (महसूल) यांचेकडे प्राप्त झाली आहे.

(३) व (४) वसई तालुक्यातील पाचुबंदर ते घोडबंदर खाडीतील वाळूगटांचे लिलाव करण्यात आले आहेत. महसूल विभाग, पोलीस व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे पथकाने संयुक्तरित्या केलेल्या पाहणीत मार्लोडे पाचुबंदर हद्दीतील समुद्रमार्गे १००० मीटर परिसरात अवैधरित्या वाळूचे उत्खनन करणाऱ्या ३ बोटीतील एकूण १४ व्यक्तींविरुध्द दि.१२/३/२०१८ रोजी वसई पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ४८(७) व (८) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उन्हेरे (ता.सुधागड, जि.रायगड) गावाजवळील पीआरसी व पद्मावती ट्रेडींग कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(३५) * १२४१७२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उन्हेरे (ता.सुधागड, जि.रायगड) गावाजवळील पीआरसी व पद्मावती ट्रेडींग कंपनीने केलेल्या सुरूंगाच्या स्फोटांमुळे उन्हेरे व पीलोसरी गावातील मंदिरासह शेकडो घरांच्या भिंतींना तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर बंदी घालण्याची मागणी तेथील ग्रामस्थ मागील ६ महिन्यांपासून करत असून जिल्हा परिषद सदस्य श्री. रविंद्र देशमुख यांच्यासह ग्रामस्थांनी पुनश्चः माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तहसिलदार, सुधागड, पोलीस निरिक्षक, सुधागड व जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे लेखी तक्रार करून काम बंद ठेवण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे करून संबंधितांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरच्या कंपन्यांवर कारवाई करून ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली आहे.

(२) ग्रामस्थ उन्हेरे बुद्रूक व जिल्हा परिषद सदस्य श्री.रविंद्र देशमुख यांनी तहसीलदार, सुधागड यांचेकडे दि.१९/४/२०१८ रोजी दुरध्वनीद्वारे उक्त आशयाची मौखिक तक्रार केली होती.

(३) व (४) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद सदस्य श्री.रविंद्र देशमुख व ग्रामस्थ उन्हेरे बुद्रूक यांचेसमवेत तहसीलदार-सुधागड, पोलीस निरीक्षक- पोलीस ठाणे पाली, मंडळ अधिकारी-पाली व तलाठी सजा उध्दर यांनी दि.१९/४/२०१८ रोजी मौजे पिलोसरी व उन्हेरे येथील सर्वे नं.३०/१ व ३०/३ या खाणीमध्ये बोअर ब्लास्ट करुन होत असलेल्या उत्खननाची संयुक्त स्थळ पाहणी केली. पाहणीमध्ये सदरची खाण ही मौजे उन्हेरे बु. या गावापासून अंदाजे दिड किलोमीटर अंतरावर असून सदर खाणीमध्ये होणाऱ्या बोअर ब्लॉस्टमुळे श्री.काळभैरव मंदिराच्या भिंतीला मोठ्या प्रमाणात तडे गेल्याचे तसेच गावातील ३२ घरांना अंशत: तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे.

तद्नंतर खाणधारकांना सदर दगडखाणीतून गौणखनिज उत्खनन तात्काळ बंद करणेबाबत तहसीलदार, सुधागड यांनी दि.१९/४/२०१८ रोजी नोटीसीद्वारे कळविले असून सद्य:स्थितीत सदर खाणीमधून बोअर ब्लास्ट करुन उत्खनन बंद करण्यात आले आहे. तसेच खाणधारकांनी लेखी प्रतिज्ञापत्राद्वारे स्थानिक ग्रामस्थांच्या घरांचे व मंदिराचे झालेल्या हानीची नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले आहे. त्यानुसार नुकसानग्रस्त घरांचे झालेल्या नुकसानीचे मुल्यमापन करण्याबाबत उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सुधागड-पाली यांना तहसीलदार, सुधागड यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील गौणखनिजाच्या अनधिकृत उत्खननाबाबत

**(३६) * १२४६३९ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यात ४०० कोटी रुपयांची रस्त्यांची कामे सुरु असुन सदर कामासाठी अनधिकृतरित्या उत्खनन केलेल्या गौण खनिजांचा मोठया प्रमाणात वापर सुरु असल्याचे तसेच पकडण्यात आलेल्या गौण खनिजांची तहसीलदार कार्यालयात नाममात्र पावती भरुन सोडवणूक केली जात असल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार नाममात्र पावती भरुन हजारो ब्रास गौणखनिजांची सोडवणुक करुन देणाऱ्या संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर तसेच संबंधीत कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करंजी (ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर) गावातील तलावातून मुरुमाचे अवैध उत्खनन केल्याबाबत

**(३७) * १२५०२१ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजी (ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर) गावातील तलावातून मुरुमाचे अवैधरीत्या उत्खनन करून या मुरुमाची ट्रॅक्टरद्वारे वाहतूक करण्यात येत असून अवैध वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर तहसिलदार यांनी दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास पकडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर सदरचे दोन्ही ट्रॅक्टर अनपेक्षीतपने लुप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी मुरुमाचे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुळकुड (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे गौण खनिजाचे बेकायदेशीररित्या उत्खनन केल्याबाबत

**(३८) * १२१९७८ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुळकुड (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे दुधगंगा नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलासाठी लागणाऱ्या गौण खनिजाचे महसूल विभागाची कोणतीही परवानगी न घेता संबंधित कंत्राटदाराने बेकायदेशीररित्या उत्खनन केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३)असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार गौण खनिजाचे बेकायदेशीररित्या उत्खनन करणाऱ्या उक्त कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील मौ.सुळकूड, ता.कागल येथील दुधगंगा नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलासाठी ९९ ब्रास मुरुम व दगड या गौण खनिजाचे संबंधित कंत्राटदाराने अवैधरित्या उत्खनन व वाहतूक केल्याचे दि.५/१/२०१८ रोजी निदर्शनास आले. त्यानुसार संबंधित कंत्राटदारास स्वामित्वधन व दंडापोटी रु.३,८६,१००/- इतकी रक्कम शासन जमा करणेबाबत तहसीलदार, कागल यांनी दि.१४/२/२०१८ रोजी आदेश पारित केले आहेत. तहसीलदार, कागल यांच्या दिनांक १४/२/२०१८ चे आदेशाविरुध्द संबंधितांनी उप विभागीय अधिकारी, कागल-राधानगरी यांच्याकडे अपील दाखल केले आहे. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करणेबाबत तहसीलदार, कागल यांचे स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गांगरखेडा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(३९) * १२५०४१ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गांगरखेडा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे मागील १० वर्षापूवी तयार करण्यात आलेल्या आमपाटी प्रकल्पात शेतजमीन गेलेले शेतकरी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान उपोषणास बसले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम सन २००८ मध्ये सुरु करण्यात आले असताना अद्यापपर्यंत प्रकल्प पूर्ण झाला नसून या प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आमपाटी प्रकल्पातील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) कार्यकारी अभियंता, आमपाटी प्रकल्प यांच्याकडून प्राप्त माहिती नुसार सद्य:स्थितीत धरणाचे काम ४० टक्के पुर्ण झाले असून, नियोजनानुसार सन २०१८-१९ मध्ये धरणाचे काम पूर्ण करावयाचे आहे.

जमीन संपादनाकरीता मौजा गांगरखेडा अंतर्गत एकूण ३ भूसंपादन प्रकरणामधील २० भूधारकांपैकी १५ भूधारकांना मोबदल्याचे वाटप करण्यात आले असून, उर्वरीत ५ भूधारकांनी वैयक्तिक तक्रारी दाखल केल्यामुळे व त्यांची प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याने मोबदला अदा करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील शेतकऱ्यांना गुलाबी बोंडअळीमुळे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४०) * ११८२९५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात गतवर्षीच्या खरीप हंगामात कापूस पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव होऊन ३३ मंडळातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असताना शासनाने केवळ दोन मंडळातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शेतकऱ्यांनी उचित कार्यवाही करण्याची मागणी शासनाकडे केली असुन ती पुर्ण न झाल्यास उपोषण करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उर्वरित धुळे जिल्हयातील ३१ मंडळातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) हे खरे आहे.

दिनांक १७ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार धुळे जिल्ह्यातील सर्व ३९ मंडळातील शेतकऱ्यांना संयुक्त पंचनाम्यानुसार ३३% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या प्रकरणी धुळे जिल्ह्यासाठी मदत जाहीर झाली आहे. तसेच दिनांक ९.५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये रु. ५४.१६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुडाळ आणि कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांची प्रलंबित रक्कम देण्याबाबत

**(४१) * ११७३३७ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई - गोवा महामार्ग चौपदरीकरणासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून विविध कारणांसाठी कुडाळ आणि कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांचे अनुक्रमे रुपये १२४ कोटी व १४० कोटी सदर प्रकल्पग्रस्तांना देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहेत काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना उक्त रक्कम न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून कुडाळ आणि कणकवली तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांची उपरोक्त रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपविभाग कुडाळमध्ये एकूण १८ गावे संपादनात येत असून मोबदला वाटपासाठी जमा रू.३८८.६८ कोटीपैकी रू.२९८.८८ कोटी रक्कम खातेदारांना दि.१५.०६.२०१८ पर्यंत वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रू.८९.८० कोटी रक्कम संबंधित खातेदारांना वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच उपविभाग कणकवलीमधील २२ गावे संपादनात येत असून मोबदला वाटपासाठी जमा रू.४९१ कोटीपैकी रू.३७० कोटी रक्कम दि.१५.०६.२०१८ पर्यंत वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रू.१२१ कोटी संबंधित खातेदारांना वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) शेतकऱ्यांनी नोटीसा स्वीकारल्या पण पुरावे जमा न केल्याने, काही खातेदार कायमस्वरूपी बाहेरगावी असल्याने, मयत खातेदारांची वारस कार्यवाही अपूर्ण असल्याने, बँक अकाऊंट तपशील सादर न करणे इत्यादी कारणांमुळे उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर मोबदला वाटपाची रक्कम शिल्लक आहे.

(३) मोबदला वाटपाबाबत व संपादित जमीन ताब्यात घेऊन संबंधीत महामार्ग प्राधिकरणाच्या ताब्यात देण्याबाबत युद्ध पातळीवर कामकाज चालू आहे. भूसंपादन तसेच मोबदला वाटपाचे प्रगतीबाबतचा आढावा शासन स्तरावरून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भात निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांची विक्री होत असल्याबाबत

**(४२) * ११९८९० श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात बंदी असलेल्या निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांची मोठया प्रमाणात विक्री करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे दिनांक ३ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असून कृषी विभागाने नागपूर आणि अमरावती विभागात अनधिकृत बियाणे विक्री करणाऱ्यांवर धाड टाकून करोडो रूपयांचे बियाणे जप्त केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धानोरा (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या कारवाईत सापडलेले ५८ क्विंटल बियाणे एचटी नसून एचटी जीन असल्याचे तपासणीअंती स्पष्ट झाले असून सदर बियाणे साठवणूक व उत्पादनासाठी कोणतीही मंजुरी केंद्राने घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुही (जि.नागपूर) तालुक्यातील धनजोडे कृषी सेवा केंद्रात अनधिकृत कापसाचे बिटी बियाने विक्री होत असल्याचे निदर्शनास आले असून दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास २९५ बॅग बनावट बिटी बियाने जप्त करुन या कृषी केंद्राचा परवाना रद्द केलेला असतानाही संबंधित अधिका-यांच्या संगंमताने कृषी केंद्र सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरणखुर्द (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) या गावात खरिप हंगाम सुरु होण्याआधीच एचटी बियाणे पोहचली असून कृषी विभागाच्या छापेमारीत २४५ एचटी बियाण्यांची पाकिटे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जप्त करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बनावट बियाण्यांची विक्री करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) कुही (जिल्हा नागपूर) तालुक्यातील श्रीकृष्ण कृषि सेवा केंद्रावर धाड टाकून २९५ अनधिकृत कापूस बियाणे जप्त करण्यात आलेले असून, पोलीस

स्टेशन, कुही येथे गुन्हा नोंद क्रमांक १४४ /१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, सदर कृषी सेवा केंद्राचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेला असून सदर केंद्र बंद आहे.

(४) होय, हे खरे आहे.

यासंदर्भात गडचांदूर, पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक १४२/१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) होय.

चौकशीत अवैध बियाणांचा साठा आढळून आलेल्या प्रकरणी संबंधितांवर आवश्यकतेनुसार फौजदारी गुन्हे दाखल करणे, साठा जप्त करणे, परवाने रद्द करणे याप्रकारची कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथील मे.निर्माण रियलटर्स कंपनीने केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(४३) * १२५४२७ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग ) येथील सिटी सर्वे क्र. १६०१ मध्ये मे.निर्माण रियलटर्स कंपनीला बांधकाम करण्यासाठी दिनांक १३ मे,२०१६ रोजी परवानगी देण्यात आली असून या परवानगीतील अट क्र. ३३ मध्ये यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक राहिल असे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार राष्ट्रीय महामार्गालगत वाणिज्य प्रकारच्या इमारतीच्या बांधकामासाठी नागरी भागात रस्त्याच्या मध्यापासुन ३७ मीटर अंतर सोडणे बंधनकारक असतांना सदर कंपनीने या अटीचे पालन न केल्याने व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची परवानगी न घेतल्याने कंपनीने केलेले अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करण्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त कंपनीने केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करून कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. तथापि दि. ०५.०८.२०१७ रोजी सदर कंपनीस राष्ट्रीय महामार्गाच्या प्रस्तावित हद्दीपासून ९.९६ मी.अंतरावर निवासी बांधकामासाठी परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) नियमानुसार राष्ट्रीय महामार्गालगत वाणिज्य प्रकारच्या इमारतीच्या बांधकामासाठी नागरी भागात रस्त्याच्या मध्यापासून ३७ मीटर अंतर सोडणे बंधनकारक असताना सदर कंपनीने या अटीचे पालन न केल्याने व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची परवानगी न घेतल्याने कंपनीने केलेले अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करण्याची तक्रार अभिलेखात प्राप्त असल्याची नोंद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समशेरपूर ते म्हैसवळण (ता.अकोले, जि.अहमदनगर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४४) * १२४३०१ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समशेरपूर ते म्हैसवळण (ता.अकोले, जि.अहमदनगर) या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याने रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार समशेरपूर ते म्हैसवळण या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
प्रश्नाधीन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे दिवशी (ब्रु) (ता.पाटण, जि.सातारा) येथील ७५० एकर जमीन हडप केल्याबाबत

**(४५) * ११९०९७ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे दिवशी (ब्रु) (ता.पाटण, जि.सातारा) येथील गावच्या मालकीची ७५० एकर जमीन मंत्रालयात अवर सचिव या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्याने आपल्या पदाचा गैरवापर करुन स्थानिक महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रांच्या आधारे हडप केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक ग्रामस्थ तसेच लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, सातारा तसेच शासनाच्या महसूल विभागाकडे गत ४ महिन्यापासून लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) ग्रामस्थ दिवशी बु ता.पाटण जि.सातारा यांनी जिल्हाधिकारी सातारा कार्यालयाकडे दि.२५/०१/२०१८ व दि.०६/०२/२०१८ रोजी अर्ज दाखल करून मौजे दिवशी (बु.) (ता. पाटण, जि. सातारा) येथील गट क्र.१५१ सह अन्य १४ जमीनींचे गा.न.नं. ७/१२ वरील नोंदी तत्कालिन मा. राज्यमंत्री (महसूल), महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ०९/०९/२०१४ रोजीच्या आदेशाप्रमाणे बदलण्यात येवू नयेत, याकरिता मागणी केली आहे. तसेच यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दि. २४.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास निवेदन सादर केले आहे.

(३) व (४) ग्रामस्थ दिवशी बु, ता.पाटण जि.सातारा यांचे तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, पाटण उप विभाग, पाटण यांचे कार्यालयामार्फत केलेल्या चौकशीत दिसून आलेल्या वस्तुस्थितीनुसार प्रश्नाधीन जमीनींचे अधिकार अभिलेखात तत्कालिन मा.राज्यमंत्री (महसूल) यांच्या दि. ०९/०९/२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. सदर आदेशाची गाव दप्तरी अंमलबजावणी करणे संयुक्तिक होणार नसल्याचे स्पष्ट होत असल्याने तत्कालीन मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे दि. ०९.०९.२०१४ रोजीचे आदेश महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५८ प्रमाणे पुनर्विलोकनात घेऊन रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी सातारा यांच्या कार्यालयाकडून दि.२१/०२/२०१८ रोजी विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयास अहवाल सादर करण्यात आला आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्या कडून प्राप्त अहवालानुसार दि. ३१.०३.२०१८ रोजी शासनास अहवाल सादर केला असून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २५८ नुसार दि. ०९.०९.२०१४ रोजीच्या आदेशाचे शासन स्तरावर पुर्नविलोकन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे अग्रेषित केला आहे. त्यावर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील रेती घाट लिलाव प्रक्रियेत झालेली अनियमितता

**(४६) * १२४७५० श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात सन २०१४-२०१५ ते २०१७-२०१८ या कालावधीत रेतीच्या ५४ घाटधारकांनी शासनाने निर्धारीत केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने घाटाच्या किंमतीच्या ¾ रक्कम भरली असतानाही केवळ एकाच रेतीघाटधारकाला काळया यादीत टाकण्यात आल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ५४ रेती घाटधारकांपैकी एकाच घाटधारकाला काळया यादीत टाकण्याची कारणे काय आहेत तसेच उर्वरीत ५३ रेती घाटधारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त ५३ घाटधारकांची १/४ रक्कम जमा न करता घाटधारकांना ताबा दिल्यामुळे तसेच विहीत मुदतीपेक्षा विलंबाने रक्कम भरल्यानंतरही घाटधारकांकडून दंड व व्याजाची रक्कम वसूल करण्यात न आल्याने शासनाचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) सन २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत अकोला जिल्हयात करण्यात आलेल्या वाळू लिलावांपैकी एकूण ५६ यशस्वी लिलावधारकांनी लिलावाच्या रक्कमेच्या उर्वरित ३/४ रक्कम विहित मुदतीमध्ये भरलेली नाही. मात्र यशस्वी लिलावधारकांकडून ही ३/४ रक्कम शासनजमा केल्यानंतर करारनामा करुन त्यांना वाळूगटाचा ताबा देण्यात आलेला आहे. या लिलावधारकांपैकी एका लिलावधारकाने वाळू उत्खननास मुदतवाढ मिळण्याबाबतची विनंती शासनास केली असता त्या लिलावधारकाने लिलावाची ३/४ रक्कम विहित मुदतीत शासनजमा केली नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे शासन निर्णय, दि.१२ मार्च, २०१३ मधील

परिच्छेद A १२ (अ) (iii) मधील तरतूदीनुसार लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळया यादीत टाकण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांना कळविण्यात आले आहे.

यशस्वी लिलावधारकांनी विहित मुदतीमध्ये ३/४ रक्कमेचा भरणा केला नसतांना विहित मुदतीनंतर अशी ३/४ रक्कम भरुन घेऊन वाळू घाटांचा ताबा लिलावधारकांना देण्याच्या जिल्हाधिकारी, अकोला कार्यालयाच्या या निर्णयाची चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, अमरावती यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुनोना ते पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) या रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(४७) * १२२०८७ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुनोना ते पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) या २८ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या बांधकामाकरीता रुपये १० ते १२ कोटींची आवश्यकता असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याच्या बांधकामाकरीता रुपये १३१ कोटीची निविदा काढण्यात आल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्‌वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अधिक रकमेची निविदा काढणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर जुनोना पोंभूर्णा नवेगांव मोरे रामा क्र.३७१ रस्त्याची ४८.५०० कि.मी. लांबीची सुधारणा करण्याच्या कामास हायब्रीड ॲन्युईटी योजनेअतंर्गत रू.११४.२४ कोटी इतक्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून तिसऱ्या बोलीमध्ये प्राप्त रु.१०७.१० कोटीची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे.

(२) व (३) होय.

अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे करण्यात आली आहे. तथापि, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने सा.बां.विभागाकडून अहवाल मागविलेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वाघणगांव ते लांजा (जि.रत्नागिरी) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४८) * ११८४०६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघणगांव ते लांजा (जि.रत्नागिरी) या रस्त्याची दूरवस्था झाल्याने नागरिकांना रस्त्यावरुन प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय अंशत: खरे आहे.
(२) व (३) मौजे वाघणगांव ते लांजा जोडणा-या मार्गामध्ये दोन रस्ते असून त्यामध्ये दाभोळे वाटूळ रस्ता रा.मा. १७५ कि.मी. १४/४०० ते २१/२४० ही. ७.०० कि.मी. व लांजा कोर्ले प्रभानवल्ली प्रजिमा-६२ लांबी कि.मी. ०/०० ते १२/५०० अशी १२.५०० कि.मी लांबी अंतर्भूत असून सदर लांबीत पडलेले किरकोळ खड्डे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

यापैकी रामा-१७५ ची लांबी हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर असून निविदा स्तरावर प्रगतीत आहे. दोन्ही रस्त्याची वरील वाहतुक सुरळीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळवणे-वेळवेवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे जोडरस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४९) * १२४३९९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळवणे-वेळवेवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे जोडरस्त्याच्या कामाची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५ टक्के अधिक दराने ६५ लाख ४२ हजार ८६८ रुपयांना स्वीकृत करण्यात आली असून या कामाचे आतापर्यंत ठेकेदाराला ६९ लाख ७५ हजार रुपये रकमेची देयके अदा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात संबंधित ठेकेदाराने कामाच्या ठिकाणी मातीचा भराव टाकण्याव्यतिरिक्त खडीकरणाचे काम देखील केलेले नसताना मोजमाप पुस्तिकेत खडीकरण आणि डांबरीकरण झाल्याचे नमूद करून ठेकेदाराला पुर्ण देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी ठेकेदाराशी संगनमत करून खोटी मोजमाप पुस्तिका तयार करून शासनाची फसवणूक करणारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात यावे आणि निकृष्ट दर्जाचे काम करणा-या

ठेकेदार यांचा समावेश कायमस्वरूपी काळ्या यादीत करावा याबाबत तक्रार कस्तुरीमृग फाऊंडेशनचे अध्यक्ष यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रधान सचिवांची प्रत्यक्ष भेट घेऊन दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली असून त्यांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रधान सचिवांच्या आदेशानंतर दक्षता व गुणनियंत्रण विभागाचे अधीक्षक अभियंता यांनी दिनांक १ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रकल्पस्थळी भेट देऊन तक्रारीतील मुद्द्यांच्या अनुषंगाने पाहणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांना शासकीय सेवेतून निलंबित करून ठेकेदार यांचा काळ्या यादीत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय

(४) होय

(५) व (६) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडून चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## कळंबोली (जि.रायगड) येथे डांबरात काळ्या मार्बलच्या चु-याची भेसळ करण्यात येत असल्याबाबत

**(५०) * ११९९३४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्त्याच्या बांधकामासाठी वापरल्या जाणा-या डांबराची चोरी करून मार्बलच्या चु-याची भेसळ करणारी टोळी सक्रीय झाली असून डांबरात काळया मार्बलचा चुरा मिसळण्याचे काम कळंबोली भागात केले जात असल्याचे दिनांक ०७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार डांबराची चोरी करून मार्बलच्या चु-याची भेसळ करणाऱ्या संबंधित टोळीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२) व (३) डांबर भेसळ केलेला टॅकर घेऊन जाणाऱ्या इसमास ठाणे शहर गुन्हे शाखेमार्फत अटक करण्यात आली असून कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२०/२०१८ भा.द.वि. कलम ३७९, ४०६, ४२०, ३४ अन्वये दि. ६.४.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अद्यापपर्यंत एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

तसेच, कळंबोली पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. २०/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. या प्रकरणी २ आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील वाळू घाटांचे लिलाव करण्याबाबत

**(५१) * १२३४१९ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात ३१ वाळू घाट लिलावासाठी ठेवण्यात आले असून २ वेळा लिलाव प्रक्रिया होवूनही केवळ सात घाटांचे लिलाव झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित लवाद प्राधिकरणाने प्रत्येक जिल्ह्यात सल्लागार नेमून मायनिंग प्लॅन करावा असे सांगितले असतानाही अद्यापपर्यंत मायनिंग प्लॅन न झाल्यामुळे वाळूपट्ट्यांचे लिलाव झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वाळू घाटांचे लिलाव न झाल्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीचे प्रमाण वाढले असून त्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून औरंगाबाद जिल्ह्याचा मायनिंग प्लॅन तयार करुन जिल्ह्यातील उर्वरित घाटांचे लिलाव करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) पर्यावरण सल्लागार यांचेमार्फत सादर केलेल्या खाणकाम आराखड्यानुसार सदर वाळूगटांच्या तिसऱ्या टप्प्याची लिलाव प्रक्रिया सुरु आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात सन २०१७-१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रु.१३५.४२ लक्ष तसेच दि.१/४/२०१८ ते ३१/५/२०१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रु.४०.७७ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कालावल (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) खाडीपात्रातील धूप प्रतीबंधक बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत

**(५२) * ११६६७२ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कालावल (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) खाडीला दरवर्षी पावसाळ्यात पूर येत असल्यामुळे जनतेने केलेल्या धूप प्रतीबंधक बंधारा बांधण्याबाबतच्या मागणीनुसार सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात असुरकर जुवा बेटाच्या बंधाऱ्यासाठी व खोत जुवा येथील बंधाऱ्यासाठी प्रत्येकी ३२ लाख ६१ हजार रुपयांची तरतुद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात तरतुद केल्यानंतरही अद्यापपर्यंत सदरहू बंधाऱ्याच्या बांधकामास सुरूवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त दोन्ही ठिकाणच्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याची कामे विनाविलंब सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे अंशत: खरे आहे. मसुरकर जुआबेट व मसुरकर खोत जुआ, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग या दोन्ही कामांना प्रत्येकी रु.१.५० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दोन्ही कामांना प्रत्येकी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात सदर रु.३२.६१ लक्ष, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.२५.८२लक्ष एवढी तरतूद करण्यात आली होती व सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रु.५.७१लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

(२) व (३) होय. हे खरे आहे. सदर कामास महाराष्ट्र राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडून किनारपट्टी क्षेत्र अधिनियम २०११ नुसार CRZ मंजूरी अप्राप्त असल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## रेंदाळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) व कर्नाटक राज्याच्या हद्दीतील कारदगा सीमेवरील अवैध उत्खननाबाबत

**(५३) * १२१२३६ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेंदाळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) व कर्नाटक राज्याच्या हददीतील कारदगा सीमेवरील गायरान जमिनीतून गौण खनिजांचे मोठ्या प्रमाणात उत्खनन करून वाहतूक करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध उत्खननाबाबत संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी, यांच्याकडे तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी होणारे उत्खनन तातडीने थांबविण्याबाबत तसेच अवैध उत्खनन करुन वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोर (जि.पुणे) तालुक्यातील डोंगर भागात अनधिकृत उत्खनन होत असल्याबाबत

**(५४) * ११९२०० श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील डोंगर भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत उत्खनन सुरु असुन या उत्खननाकडे महसूल विभाग दुर्लक्ष करीत असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील निरा देवधर व भाटघर या धरणाच्या परिसरातील जमिनींचे सपाटीकरण करण्याचे काम हिर्डोशी, मळे, पांगारी या भागत सुरु असुन डोंगर सपाट करताना परवानगी न घेता झाडांचीही कटाई करून उपसा केलेली माती नर्सरीसाठी पुणे येथे नेली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबबत चौकशी करून विनापरवाना उत्खनन, डोंगर सपाटीकरण, झाडांची तोड तसेच मातीची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्ण केलेल्या कामांची प्रमाणपत्रे सादर न केल्याबाबत

**(५५) * १२०८०० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सन २०१४-१५ ते २०१६-१७ या तीन वर्षाच्या कालावधीत केलेल्या ६० हजार कोटीच्या खर्चाची कामे पूर्ण झाल्याची प्रमाणपत्रे सादर न केल्याचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या अहवालाआधारे दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालात सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे एका कामाचा निधी दुस-या कामावर वळविला जात असून रस्त्याची कामे करताना अनेकदा उपलब्ध निधीपेक्षा अधिक कामे करण्यात आल्याचे तसेच विभागाच्या वार्षिक सरासरी खर्चापेक्षा देयकांची थकबाकी जास्त असून यामुळे केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाल्याबाबत आक्षेप घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने तीन वर्षात पूर्ण केलेल्या कामांची प्रमाणपत्रे सादर न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधीत दोषी अधिकारी व इतर संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या मार्च, २०१६ च्या राज्य वित्त अहवालात राज्यातील विविध विभागांची रू.६३ हजार कोटीची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित असल्याचे नमूद केले आहे. त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाची रू.९२.२३ कोटीची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित दर्शविण्यात आली आहे. याची तपासणी प्रगतीत आहे.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या मार्च, २०१७ च्या आर्थिक क्षेत्रावरील अहवालात प्रश्नांकित बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. निधी दुसऱ्या कामावर वळविल्याबाबत माहिती घेण्यात येत आहे. तसेच मंजूर कामे निविदा प्रक्रियेअंती त्याच वर्षी पूर्ण होऊन संपूर्ण निधी खर्च होणे आवश्यक असल्याने, साधारणपणे मंजूर निधीपेक्षा जास्त कामे मंजूर केली जातात.

(३), (४) व (५) याबाबत संबंधितांकडून अहवाल घेऊन उपयोगीता प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्यांना पाठविण्यात येतील.

-----------------

## डिंग्रजवाडी (ता.शिरूर, जि.पुणे) येथे बेकायदेशीरपणे मांगूर जातीच्या माशांचे संवर्धन होत असल्याबाबत

**(५६) * ११६६१५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिंग्रजवाडी (ता.शिरूर, जि.पुणे) येथे अनेक वर्षापासून बेकायदेशीरपणे मांगूर जातीच्या माशांचे संवर्धन केले जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिंग्रजवाडी येथे बेकायदेशिररित्या संवर्धन करित असलेल्या मांगुर माशांच्या तळयात कोंबड्यांची घाण, खाण्या योग्य नसलेले कोंबडीचे मांस टाकत असल्याने परिसरात मोठी दुर्गंधी पसरली असून याठिकाणी कोंबडीचे मांस खाण्यासाठी मोठ-मोठ्या घारी फिरतात तसेच हे क्षेत्र विमानकक्षेच्या दुसऱ्या पट्ट्यात येत असल्याने विमानासही धोका संभवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांनी डिंग्रजवाडी येथे सुरू असलेल्या मत्स्य शेतीची दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यादरम्यान पाहणी केली असता अनधिकृतपणे मांगूर माशांचे संवर्धन करत असल्याचे आढळून आल्यानंतर दिनांक १५ एप्रिल २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी नोटीस देत आठ दिवसांमध्ये प्रकल्प पूर्णपणे बंद करून मत्स्यसाठा नष्ट करावा असे लेखी आदेश दिले असतांनाही व्यावसायिकांनी व्यवसाय बंद न करता बेकायदेशीरपणे मांगूर माशांचे संवर्धन सूरू ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय, मौजे डिंग्रजवाडी येथे बेकायदेशीररित्या बंदी असलेल्या मांगूर जातीचे संवर्धन करणाऱ्या स्थानिक/ परप्रांतीय १२ मत्स्यकास्तकारांविरुद्ध शिक्रापुर पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम १८८ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटापांगरा ते खडका (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत

**(५७) * ११९७५० श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटापांगरा ते खडका (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यात येत असल्याबाबतची तक्रार खडका येथील सरपंचांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, घाटंजी यांच्याकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने या रस्त्याच्या बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर व त्यास मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय, सदर कामाची तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती व नागपूर यांनी केली आहे.
(३) कामाचा दर्जा चांगला आहे. कंत्राटदार तसेच अधिकारी यांनी कोणतीही अनियमीतता केलेली नाही त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील शेतक-यांना ठिबक व तुषार सिंचन संचाचे अनुदान देण्याबाबत

**(५८) * १२५२६२ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षात ठिबक व तुषार सिंचन संच योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावांना अनुदान मिळणेबाबतचे पत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली यांनी संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच सदरच्या प्रस्तावांना अद्यापर्यंत अनुदान न देण्याबाबतची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीनूसार सदर प्रस्तावांना तातडीने अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) आर्थिक वर्षात उपलब्ध निधीच्या मर्यादेत जिल्हयांना आर्थिक लक्षांक दिला जातो. सदर लक्षांकाच्या मर्यादेत पूर्वसंमती देऊन योजनेची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.

सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये सांगली जिल्हयासाठी अनुक्रमे रुपये ७.०६ कोटी व रुपये १५.१५ कोटी एवढा आर्थिक लक्षांक देण्यात आला होता. सदर निधीच्या मर्यादेत पूर्वसंमती दिलेल्या व सुक्ष्म सिंचन संच बसवून अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे. पूर्वसंमती दिलेल्या कोणत्याही लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात कुक्कुटपालन अनुदानाची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(५९) * ११९३२८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात कुक्कुटपालन अनुदानाची अनेक प्रकरणे प्रलंबित असुन पंचायत समिती पशुधन विकास अधिकारी, बुलढाणा यांनी कुक्कुटपालन अनुदान मंजूर करण्याकरिता लाच मागितल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन कुक्कुटपालन अनुदानाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) बुलढाणा जिल्हयात सन २०१७-१८ मध्ये एकूण पात्र ३०९ अर्जामधून उपलब्ध निधी रु. ६.०० लक्ष यास अधिन राहून, जिल्हास्तरीय निवड समितीने एकूण ७५ लाभार्थ्यांच्या निवड केलेली असून, या सर्व लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, बुलढाणा यांनी कुक्कुटपालन अनुदान मंजूर करण्याकरीता दिनांक २४.३.२०१८ रोजी लाच मागितल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) व (३) होय.

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, बुलढाणा यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना सूचीत केल्यानुसार डॉ.भंडारे यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनास आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचेकडून दि.०२.०७.२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळवटखेड-जावळी (ता.खेड, जि.रत्नागिरी) धरणामध्ये केमिकल वापरून मासेमारी केल्याबाबत

**(६०) * १२४५२४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळवटखेड-जावळी (ता.खेड, जि.रत्नागिरी) धरणामध्ये धरणाच्या ठेकेदारानी केमिकलचा वापर करून दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मासेमारी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाच्या तलावामध्ये मासेमारीसाठी वापरण्यात आलेल्या केमिकलमुळे लहान-मोठ्या माशांसह इतर जलचर देखील मृत झाले असून पाण्याला उग्र वास येत असल्यामुळे पाणी वापरण्यास अयोग्य झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधीत ठेकेदार तसेच सदर प्रकरणी दुर्लक्ष केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दवडीपार (बेला) (जि.भंडारा) व आवरमारा (जि.नागपूर) या गावातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(६१) * १२२१४० श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसे प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या दवडीपार (बेला) येथील प्रकल्प बाधित ९८ घराचे पुनर्वसन करण्याबाबत दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा आढावा बैठक सभेत विभागाला निर्देश देण्यात आले असून सदर ९८ घरांचे पुनर्वसन करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त आवरमारा गावातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्यासंबधी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने शासनास आदेश दिल्याचे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करुन त्यांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२३.४.२०१८ रोजी निवेदन दिले आहे.

दि.२७.४.२०१८ रोजी विभागीय आयुक्त,नागपूर येथे झालेल्या बैठकीत मा.पालकमंत्री यांनी दवडीपार गावठाणाचे फेरसर्व्हेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत.

(२) जनहिन याचिका क्र.६१/२०१८ मध्ये दि.२/५/२०१८ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशान्वये शासनास पुनर्वसनविषयक कार्यवाही चालू ठेवण्याची मुभा दिली आहे.

(३) दवडीपार (बेला) ता.भंडारा या गावाचे सर्वेक्षण जलसंपदा विभागाने केले असून सदर गावठाण बाधित होत नसल्याचे दिसून आले आहे.

नागपूर जिल्हयातील मौजा-आवरमारा या गावातील सुमारे १८% जमीन संपादीत केली आहे. मौजा आवरमारा गावठाण प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येत नाही. तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र.६१/२०१८ दाखल असून मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कसारा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील जमिनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(६२) * १२०९७३ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आदिवासी मयत पदू रामा धोबी यांची सर्वे नं.५१ "अ" मधील ३० एकर जमिनीचे प्रकाश गायकर व तेजस गायकर यांनी काही अधिका-यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करून जमिनीची विक्री केल्याचे दिनांक २५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर मयत आदिवासीच्या जमिनीची बनावट कागदपत्राच्या आधारे विक्री करणा-यांवर व त्यास सहकार्य करणाऱ्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्हयांना जोडणाऱ्या घोडगे-सोनवडे या घाट रस्त्याच्या कामाबाबत

**(६३) * ११६७०५ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्हयांना जोडणाऱ्या घोडगे-सोनवडे या प्रस्तावित घाट रस्त्यास वन व पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक असुन सदर रस्त्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घाटाची एकूण लांबी ११ कि.मी. असून प्रत्यक्ष घाटक्षेत्र ९ कि.मी. आहे तसेच या नियोजित घाटमार्गामुळे सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्हयातील वाहतुकीचे अंतर ४० किलोमीटर पर्यंत कमी होणार असून उद्योग व पर्यटन व्यवसायास चालना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्यासाठी आवश्यक परवानग्या मिळवून रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) वन्यजीव विभाग, नागपूर यांची स्टेज -१ ची परवानगी प्राप्त झाली असून, पर्यावरण विषयक ना हरकत दाखला मिळणेबाबत पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली येथे झालेल्या Expert Appraisal Committee च्या बैठकीत शिफारस झालेली आहे. तसेच National Board of wildlife च्या परवानगीसाठी वनविभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.
(५) सदर रस्ता ज्या वनजमिनीच्या क्षेत्रातून जात आहे, ते क्षेत्र Ecosensitive असल्यामुळे पर्यावरण विभागाच्या विविध परवानग्या आवश्यक आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.